टाइम्स

बुधवार, दि. १० फेब्रुवारी २०१६

# हळबे महाविद्यालयाच्या एनएसएस निवासी शिबिराचा समारोप

दोडामार्ग, ९ फेब्रुवारी (वार्ताहर)-सुख आणि आनंद या बाजारात मिळणाऱ्या वस्तु नव्हेत तर त्या मिळविण्यासाठी आपण स्वतः आनंदी राहून इतरांशी चांगले वागावे म्हणजे आपणाला आपोआप आनंद मिळेल असे प्रतिपादन कळणे मुक्तद्वार ग्रंथालयाचे संस्थापक हरिश्चंद्र भिसे यांनी केले. ते लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या सात दिवशी विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले, आपण आपल्या सहकाऱ्यांसोबत जसे वागू तसेच आपले सहकारी देखील आपल्याशी वागतील. आपल्या वागण्यामुळे, बोलण्यामुळे व कृतीमुळे इतरांना त्रास होत असेल तर तो गुन्हा आहे. त्यामुळे आपण इतरांशी कसे वागायचे हे आपणच ठरवायचे असते. तसेच वेळेचा सदुपयोगही करायला त्यांनी सांगितले. त्याचबरोबर आपण वाचनाचा छंद जोपासला पाहिजे. त्यामुळे व्यक्तीच्या विचारांची प्रगल्भता वाढते असे ते म्हणाले. त्यांच्या स्वरचित 'मी' या कवितेचे वाचन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. व्ही.ए.पाटील यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की या निवासी शिबिराच्या सात दिवसांत मिळणारा आनंद हा अवर्णनीय आहे. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, समाजाप्रती विचार केला पाहिजे, ज्ञानाबरोबरच उत्तम आरोग्यही महत्वाचे आहे असे ते म्हणाले. यावेळी स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून शुभम गवस व स्वाती फाटक यांचा गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कळणे येथील माऊली देवस्थान कमिटी अध्यक्ष सखाराम देसाई, माजी सैनिक श्री.देसाई, प्रा.आर.ए.मोरे, प्रा.डॉ.एस.यु.दरेकर, प्रा.सोनम देसाई व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता गवस तर आभार पूनम देसाई हिने मानले.